# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग,
प्रभादेवी रेल्वे स्टेशनजवळ, मुंबई ४०००१३, दूरध्वनी- ०२२४३२२६८५०/१२


---

जा.क्र.मका/प्रसिद्धी/२०२१-२२/९३३ दिनांक - २१/०८/२०२१

परिपत्रक

विषय - सर्वसाधारण शिष्यवृत्ती योजनेबाबत.

संदर्भ - मका/ग्रंथालय/१६-१७/१९ दिनांक २३ जून २०१६

उपरोक्त संदर्भीय परिपत्रकातील तक्ता ब) मध्ये सर्वसाधारण शिष्यवृत्ती योजनेची इयत्ता व शिष्यवृत्ती रक्कम स्पष्टपणे नमूद करण्यात आली आहे. याबाबत अधिक स्पष्टता यावी यासाठी पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

सुधारित तक्ता ब)

| अ. क्र. | इयत्ता / अभ्यासक्रम | वर्ष | शिष्यवृत्ती रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| १ | १० वी ते १२ वी | | २०००/- |
| २ | पदवी - शासन/विद्यापीठ मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रम वगळून | प्रथम/द्वितीय/तृतीय | २५००/- |
| ३ | पदव्युत्तर पदवी - शासन / विद्यापीठ मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रम वगळून | प्रथम/द्वितीय | ३०००/- |
| ४ | व्यावसायिक पदविका (डिप्लोमा) - शासन / विद्यापीठ मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रम. | प्रथम/द्वितीय/तृतीय | २५००/- |
| ५ | व्यावसायिक पदवी (डिग्री) / पदव्युत्तर पदवी (पोस्ट ग्रॅज्युएशन डिग्री) - शासन / विद्यापीठ मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रम. | प्रथम/द्वितीय/तृतीय | ५०००/- |
| ६ | एमपीएससी पूर्वपरीक्षा उत्तीर्ण | | ५०००/- |
| ७ | युपीएससी पूर्वपरीक्षा उत्तीर्ण | | ८०००/- |
| ८ | पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी नोंदणी झालेले विद्यार्थी | | ५०००/- |

अभ्यासक्रमांना मान्यता शासन / विद्यापीठ स्तरावर दिले जाते. त्यामुळे वरील नमूद यादी मार्गदर्शक स्वरुपाची असून शासन / विद्यापीठ मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांना पुरक आहे. शिष्यवृत्ती योजनेचे अर्ज तपासतांना विद्यार्थ्यास चालू शैक्षणिक वर्षात ज्या किमान शैक्षणिक पात्रतेच्या आधारे प्रवेश मिळाला असेल त्या अभ्यासक्रम / इयत्तेचे गुण (किमान ६० टक्के गुण) विचारात घेऊन शिष्यवृत्ती मंजूर करण्यात यावी. किमान शैक्षणिक पात्रतेबाबत अधिक स्पष्टतेची आवश्यकता भासल्यास संबंधित शैक्षणिक संस्था / विद्यापीठ यांचा चालू शैक्षणिक वर्षाचा प्रवेश अर्ज / माहितीपत्रक (प्रॉस्पेक्ट) इत्यादीच्या आधारे खातरजमा करण्यात यावी.

उपरोक्त सुधारित तक्ता ब) मध्ये नमूद इयत्ता/अभ्यासक्रमाव्यतिरिक्त मंडळाने यापुर्वी निर्गमित केलेली अन्य कोणतीही अभ्यासक्रमनिहाय यादी विचारात घेण्यात येऊ नये.

सदर परिपत्रक पुढील आदेश निघेपर्यंत लागू राहील.

(रविराज इळवे)
कल्याण आयुक्त

प्रत :

१. सर्व अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई. **

२. सहायक कल्याण आयुक्त, सर्व विभागीय कार्यालये

३. कामगार कल्याण अधिकारी, सर्व गट कार्यालये

४. सर्व केंद्र प्रमुख

** सहायक कल्याण आयुक्त (संगणक) यांनी सदर परिपत्रकानुसार मंडळाच्या public.mlwb.in या संकेतस्थळात आवश्यक बदल करावेत.

# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

मध्यवर्ती कार्यालय, हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन,
सेनापती बापट मार्ग, प्रभादेवी रेल्वे स्थानकाजवळ, मुंबई – ४०००१३.
दूरध्वनी क्र. : ०२२-४३२२६८२५५/२६ ई-मेल : mlwbpro53@gmail.com / pro.mlwb-mh@gov.in

## सर्वसाधारण शिष्यवृत्ती योजना - नियम व अटी

१. सदर शिष्यवृत्ती योजना महाराष्ट्र कामगार कल्याण निधी ( Maharashtra Labour Welfare Fund ) भरणाऱ्या कामगारांच्या पाल्यांसाठी आहे.

२. अर्ज भरताना कामगाराचा मंडळाने दिलेला LIN नंबर आवश्यक आहे.

३. सदर योजना इयत्ता ९ वी पास झाल्यानंतर अर्थात इयत्ता १० पासून पुढील शिक्षण घेणाऱ्या कामगार पाल्यांसाठी आहे.

४. मागील परीक्षेत किमान ६०% गुण असणे गरजेचे. (विद्यार्थ्यास चालू शैक्षणिक वर्षात ज्या किमान शैक्षणिक पात्रतेच्या आधारे प्रवेश मिळाला असेल त्या अभ्यासक्रम/ इयत्तेत किमान ६०% गुण असणे आवश्यक आहे )

५. शिष्यवृत्ती केवळ शासनमान्य अभ्यासक्रमासाठी आहे. शासनमान्य नसलेल्या अभ्यासक्रमासाठी अर्ज करू नये.

६. मुक्त विद्यापीठ, बहिस्थ: विद्यापीठ / दूरस्थ शिक्षण घेणारे / अप्रेंटीसशिप - इंटर्नशिप व मानधन, मोबदला, Stipend घेणा-या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळणार नाही.

७. अर्जासोबत जोडवयाची सर्व कागदपत्रे मूळ स्वरूपात स्कॅन (Scan Original Documents) केलेली असावीत. झेरॉक्स स्कॅन करून अर्जासोबत अपलोड केल्यास अर्ज बाद करण्यात येईल.

८. शिष्यवृत्ती अर्ज भरताना एकूण गुण, प्राप्त गुण व प्राप्त गुणांची टक्केवारी इत्यादी तपशील स्पष्ट नमूद करावा. ज्या विद्यार्थ्यांना ग्रेड / पॉईंट किंवा इतर पध्दतीने गुण प्राप्त असतील त्यांनी मिळालेल्या गुणांची टक्केवारी संबंधित महाविद्यालयातुन पत्राद्वारे प्राप्त करावी व ते पत्र देखील अर्जासोबत अपलोड करावे.

९. कामगारांच्या दिव्यांग पाल्यांना शासनाच्या धोरणानुसार एकूण शिष्यवृत्ती रक्कमेच्या ३% प्रमाणात सरसकट शिष्यवृत्ती मंजूर केली जाईल. दिव्यांगासाठी ६०% गुणांची अट तसेच पालकांच्या उत्पन्नाची अट शिथिल करण्यात आली आहे. शासन नियमानुसार दिव्यांग विद्यार्थ्यांना दिव्यांग प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

१०. अर्ज भरण्यापूर्वीची पूर्वतयारी - कामगारांचा LIN नंबर, कामगारांचा फॉर्म १६ किंवा आस्थापनेणे दिलेला उत्पन्न दाखला, विद्यार्थ्यांची मागील वर्षाची गुणपत्रिका, ग्रेड / पॉईंट असल्यास टक्केवारीत रूपांतर केलेले महाविद्यालयाचे पत्र, चालू शैक्षणिक वर्षाचे बोनाफाईड, शैक्षणिक खंड असल्यास तहसीलदार प्रमाणपत्र, दिव्यांग असल्यास शासन नियमानुसार प्रमाणपत्र, पालक व विद्यार्थ्यांचे आधार कार्ड, रेशनकार्ड, विद्यार्थ्यांच्या बँक खात्याचा कॅन्सल्ड चेक किंवा विद्यार्थ्याच्या बँक खात्याच्या पासबुकचे सर्व तपशील असलेले पृष्ठ इत्यादी सर्व संबंधित कागदपत्रे मूळ स्वरूपात स्कॅन केलेली असावीत.

११. सदर शिष्यवृत्ती मंडळाची तरतूद आणि कामगार पालकांचा उत्पन्न गट, विद्यार्थ्याची परीक्षेतील टक्केवारी या निकषावर उत्पन्न गटातील गुणानुक्रमे / मेरीट नुसार दिली जाते.

१२. अपूर्ण माहिती दिलेले व कागदपत्रांची पूर्तता नसलेले अर्ज ऑनलाईन सादर करू नयेत. अर्ज मंडळाने दिलेल्या विहित नमुन्यात व योग्य मूळ कागदपत्रांसह विहित कालावधीत तसेच सुस्पष्ट कागदपत्रांसह सादर करावेत. अन्यथा अर्ज बाद होईल. याची सर्व जबाबदारी विद्यार्थी व पालकांची असेल.

प्रसिद्धी व जनसंपर्क अधिकारी